# कोल्हापूर जिल्हा पन्हाळा तालुक्यातील सामाजिक व आर्थिक विकास आणि स्त्री पुरुष लिंग गुणोत्तराच्या संहसंबंधाचा तुलनात्मक अभ्यास (२०११)

**प्रा. अश्विनी खंडेराव मुरावणे**
सह्हायक प्राध्यापक, श्री शिव शाहू महाविद्यालय, सरूड
**डॉ. ओमप्रकाश शहापूरकर**
विभागप्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
**डॉ. सुनिल भोसले**
सह्हायक प्राध्यापक, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

---

**सारांश**

देशातील आर्थिकदृष्ट्या विकसित मानल्या जाणाऱ्या पंजाब, हरियाणा, दिल्ली, गुजरात आणि महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये मुलींची संख्या झपाट्याने कमी होत आहे. त्यातही आर्थिक सुबत्ता असणाऱ्या शहरी भागांमधून मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर जास्तच विषम होत चालले आहे. पूर्वी गर्भजलपरीक्षा आणि आता अल्ट्रासाऊंड सोनोग्राफीच्या तंत्रज्ञानाचा गर्भाचे लिंग जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात होणारा गैरवापर आणि त्यानंतर मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात, तसेच एकूणच मुलगी म्हणून केले जाणारे दुर्लक्ष्य या सर्व कारणांमुळे मुलींची संख्या वेगाने कमी होत चालली आहे. महाराष्ट्रात विकसित समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यामध्येच मुलींची संख्या कमी होत आहे. ज्या भागात आर्थिक विकास झाला, कारखानदारी आली आणि लोकांच्या हातात थोडा फार पैसा आला, तेथेच सोनोग्राफीचे तंत्रज्ञान घेऊन डॉक्टर पोहचले आणी परिणामी लिंगनिदान आणि मुलीचे गर्भपात मोठ्या प्रमाणात होत आहेत (महाराष्ट्र राज्य महिला आयोग). अभ्यास क्षेत्रामध्ये सुद्धा याच प्रकारची स्थिती प्रखरतेने दिसून येते. कालखंडाचा विचार केला असता बाल लिंग गुणोत्तरामध्ये दर १००० मुलांच्या मागे १९९१ (९३१) च्या तुलनेत २०११ मध्ये (८४३) ८८ मुली कमी झाल्या आहेत.

---

**प्रस्तावना:**

मानवी विकासाचा संबंध मानवी कल्याणाशी जोडण्यात आला आहे. मानवी जीवनाचं कल्याण साधणाऱ्या बाबींमध्ये जीवनातील मुलभूत गरजा, शिक्षण, आरोग्य, रोजगार, उत्पन्न आणि संपत्तीचं समान वितरण इ. चा अंतर्भाव होतो. मानवी जीवनाचे कल्याण साधणाऱ्या या निर्देशांकाचे मापन करणाच्या वेगवेगळया पद्धती आहेत. अर्थशात्रज्ञाच्या मते, सामाजिक व आर्थिक निर्देशांकाच्या आधारे तयार करण्यात आलेला विकास निर्देशांक (Development Index) हा सामाजिक आणि वैयक्तिक कल्याणाचं मापन करण्यासाठी दरडोई उत्पन्नापेक्षा जास्त अचूक साधन आहे.

सदर संशोधनामध्ये पन्हाळा तालुक्यातील मंडल विभागांचा संयुक्त विकास निर्देशांक पी.आर. व्यास यांनी त्यांच्या “Social Amenities and Regional Development” या पुस्तकामध्ये वापरलेल्या सूत्रानुसार काढण्यात आला आहे. पी.आर. व्यास यांच्या सूत्रानुसार विशीष्ट प्रदेशातील लोकसंख्येला व वसाहतीनां उपलब्ध असलेल्या सामाजिक व आर्थिक सोई सुविधांच्या विचार करून संयुक्त विकास निर्देशांक काढला जातो. स्त्री-पुरुष लिंग

गुणोत्तरावर प्रामुख्याने जीवशास्त्रीय घटकांचा प्रभाव असतो परंतु मानवी हस्तक्षेप व इतर घटकांच्या प्रभावामुळे नैसर्गिक स्त्री-पुरुष प्रमाणामध्ये असंतुलन निर्माण होत असल्याचे आढळून येत आहे. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटीक्स अँड इकॉनॉमिक्स, पुण्याच्या पॉप्युलेशन रिसर्च सेंटर (पीआरसी) अभ्यास करून असे दाखवून दिलं आहे, की ज्या जिल्ह्यात सोनोग्राफी केंद्रांची संख्या जास्त, तेथे 0-६ वयोगटातला सेक्स रेशो विपरीत आहे. त्यांचे आणखी तीन महत्वपूर्ण निष्कर्ष आहेत. एका आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सुधारलेल्या भागात (उदा. पंजाब, हरियाणा, दिल्ली, चंडीगड, गुजरात आणि महाराष्ट्राचा पश्चिम भाग) मुलींच्या प्रमाणात भारी घट आली आहे. राज्यातील ७८ टक्के सोनोग्राफी केंद्र ही मुंबई, पुणे, नाशिक व कोल्हापूरसह पुढारलेल्या १६ जिल्ह्यामध्ये आहेत तसेच ५० टक्के केंद्रे ही केवळ महानगरपालिका क्षेत्रात आहेत. सोनोग्राफी सेन्टर्सची संख्या व बालिका-बालक प्रमाणातील घाट यामध्ये 'स्टॅटीस्टीकली सिग्नीफिकंट को-रिलेशन आहे (लक्ष्मीकांत देशमुख). स्त्री-पुरुष प्रमाणावर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा प्रस्तुत प्रकरणामध्ये शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तरावर परिणाम करणाऱ्या घटकांचा शोध घेण्यासाठी 'मेट्रिक्स कोरीलेषण' पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**उद्दिष्ट्ये:**

१. पन्हाळा तालुक्यातील लिंग एकूण व बाल वयोगटातील स्त्री-पुरुष लिंगगुणोत्तराच्या अभ्यास करणे.
२. अभ्यास क्षेत्रातील सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सोई सुविधा व लिंग गुणोत्तर यांच्या सहसंबंधांचा अभ्यास करणे

**अभ्यासक्षेत्र:**

प्रस्तुत लिंग-गुणोत्तराच्या स्थल-कालीय बदलाच्या अभ्यासासाठी लिंग गुणोत्तराच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्याची निवड करण्यात आली आहे. पन्हाळा तालुका कोल्हापूर जिल्ह्याच्या वायव्य भागात स्थित आहे. पन्हाळा तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १६° ३५' ते १६° ५४' उत्तर ते ७३° ४८' ते ७४° १३' पूर्व रेखावृत्त इतका आहे. पन्हाळा तालुक्याचे क्षेत्रफळ ५७३.९२ चौ.कि.मी असून ते कोल्हापूर जिल्ह्याच्या (७६८५ चौ.कि.मी) ७.४६ टक्के इतके आहे (कोल्हापूर जिल्हा जनगणना अहवाल २०११). पन्हाळा तालुक्याच्या उत्तरेस सांगली जिल्हा, पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा, पूर्वेस हातकणंगले तालुका, तर दक्षिणेस राधानगरी तालुका आहे. मसाई पठार आणि पन्हाळा डोंगर रांगा या सह्याद्री पर्वत रांगांचा अविभाज्य भाग असून त्या पन्हाळा तालुक्याच्या मध्यातून पसरल्या आहेत. जनगणना अहवाला नुसार पन्हाळा तालुक्याची लोकसंख्या २०६८७२ (१९९१), २३८३८३ (२००१) व २५९४१७ (२०११) इतकी आहे. तसेच जनगणना अहवालानुसार लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी ला अनुक्रमे ३६९, ४२६ आणि ४६३, इतकी आहे. पन्हाळा हे तालुक्याचे प्रशासकीय ठिकाण असून ते कोडोली, कोतोली, कळे, बाजारभोगाव आणि पन्हाळा या ५ मंडल विभागात विभागले आहे. पन्हाळा तालुक्यामध्ये १३१ गावांचा समावेश असून २०११ च्या जनगणनेनुसार १ जनगणना शहर व १ नगरपरिषद आहे.

**अभ्यास पद्धती:**

लिंग-गुणोत्तर काढण्यासाठी पुढील सूत्राचा उपयोग करण्यात आला आहे.

$$\text{लिंग गुणोत्तर} = \frac{\text{स्त्रियांची एकूण लोकसंख्या}}{\text{पुरुषांची एकूण लोकसंख्या}} * १००० $$

लिंग गुणोत्तराच्या स्थल-कालीय बदलाचा अभ्यास करण्यासाठी सन १९९१, २००१ व २०११ च्या सांख्यिकी सामग्रीचे विश्लेषण गावनिहाय तसेच मंडल विभागनिहाय वर्गीकरण पुढील चार गटामध्ये करण्यात आले आहे. लिंग गुणोत्तराच्या विभागणीसाठी कमी (९५० पेक्षा कमी), मध्यम (९५१ ते १०००) आणि जास्त (१००० पेक्षा अधिक) असे असे ३ विभाग केले आहेत. मेट्रिक्स संहसंबंध (कोरिलेशन) या सांख्यिकी पद्धती द्वारे सामाजिक आणि आर्थिक पायाभूत सोई सुविधा व लिंग गुणोत्तर यांच्या संहसंबंधांचा आकडेवारीच्या विश्लेषणावरून निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

जसे,

CDI = विकास निर्देशांक सहसंबधीत चल, i

Pi = विशिष्ठ क्षेत्रातील चलाचे शेकडा प्रमाण i, (मंडल विभाग)

PI = विशिष्ठ क्षेत्रातील चलांच्या शेकडेवारीची सरासरी I, अभ्यास क्षेत्र (तालुका).

$$CDI = \frac{Pi}{PI} X 100$$

संयुक्त विकास निर्देशांक

$$CID = \frac{CDI_1 + CDI_2 + CDI_3 \ldots\ldots\ldots\ldots CDI_n}{N}$$

जसे,

CID = संयुक्त विकास निर्देशांक

$CDI_1$ = विकास निर्देशांक सहसंबधीत चल, i

N = एकूण चल

**पन्हाळा तालुका भौतिक सोई सुविधांचा विकास व लिंग गुणोत्तराचा सहसंबंध**

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण १२ तालुके असून यामध्ये प्राकृतिक, आर्थिक व सामाजिक दृष्टीकोनातून विविधता आढळते. सामाजिक व आर्थिक सोई सुविधांच्या संयुक्त निर्देशांकानुसार शिरोळ (२५.४४), हातकणंगले (२५.१२), करवीर (२२.०७), कागल (२१.५७), गडहिंग्लज (१९.६४) या तालुक्य नंतर पन्हाळा (१९.०६) तालुक्याचा क्रमांक लागतो (एस.जी.भोसले). यावरून स्पष्ट होते की, पन्हाळा तालुका हा मध्यम विकसित गटामध्ये

समाविष्ट होतो. तक्ता क्र. ४.१० मध्ये X1 शैक्षणिक सुविधा, X2 वैद्यकीय सुविधा, X3 स्वच्छता विषयक सुविधा, X4 मार्केट सुविधा, X5 बँक सुविधा, X6 वाहतुकीच्या सोई, X7 संदेशवहन सुविधा, X8 दै.वृत्तपत्र सुविधा व X9 नळ पाणीपुरवठा सुविधा या स्वतंत्र चलांचा (Indipendant Veriabl ) Y1 एकूण स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर व Y2 बाल वयोगटातील लिंग गुणोत्तर या अवलंबित चलावर (Dependent Veriable) झालेल्या सकारात्मक व नकारात्मक परिणामाचे सविस्तर विवेचन केले आहे. तसेच तक्ता क्र. १.१ मध्ये पन्हाळा तालुक्यातील संयुक्त विकास निर्देशांक व स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर सहसंबंध दर्शवण्यात आला आहे.

**तक्ता क्र. १.१ पन्हाळा तालुका: भौतिक सोई सुविधा निर्देशांक चल सूची**

| **चल** | **निर्देशांक** | **चल** | **निर्देशांक** |
|---|---|---|---|
| **Y1** | **एकूण लिंग गुणोत्तर** | **Y2** | **बाल वयोगट लिंग गुणोत्तर** |
| $X_1$ | शैक्षणिक सुविधा | $X_6$ | वाहतुकीच्या सोई |
| $X_2$ | वैद्यकीय सुविधा | $X_7$ | संदेशवहन सुविधा |
| $X_3$ | स्वच्छता विषयक सुविधा | $X_8$ | दै.वृत्तपत्र सुविधा |
| $X_4$ | मार्केट सुविधा | $X_9$ | नळ पाणीपुरवठा सुविधा |
| $X_5$ | बँक सुविधा | | |

**तक्ता क्र. १.२ पन्हाळा तालुक्यातील मंडल विभाग निहाय एकूण व बाल वयोगट लिंग गुणोत्तराचे वितरण**

| अं. न | मंडल विभाग | एकूण लिंग गुणोत्तर | बाल वयोगट लिंग गुणोत्तर |
|---|---|---|---|
| १ | कोडोली | ९०६ | ८२३ |
| २ | पन्हाळा | ९१६ | ८१८ |
| ३ | कोतोली | ९३५ | ८६९ |
| ४ | बाजारभोगाव | ९५१ | ९०२ |
| ५ | कळे | ९२९ | ८३१ |

**तक्ता क्र. १.३**

**पन्हाळा तालुका: भौतिक सोई सुविधांचे निर्देशांक व संयुक्त विकास निर्देशांक**

| अं. न | मंडल विभाग | $X_1$ शैक्षणिक सुविधा | $X_2$ वैद्यकीय सुविधा | $X_3$ स्वच्छता विषयक सुविधा | $X_4$ मार्केट सुविधा | $X_5$ बँक सुविधा | $X_6$ वाहतुकीच्या सोई | $X_7$ संदेशवहन सुविधा | $X_8$ दै. वृत्तपत्र सुविधा | $X_9$ नळ पाणीपुरवठा सुविधा | संयुक्त विकास निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोडोली | २.१० | २.३३ | २.१२ | ५.६१ | २.१४ | १.९४ | २.०६ | २.४० | १.९९ | २२.६९ |
| २ | पन्हाळा | १.८७ | १.९० | १.९५ | ०.७५ | १.८८ | २.११ | २.०२ | १.८८ | २.०४ | १६.४० |
| ३ | कोतोली | २.१८ | २.१४ | २.०७ | १.९८ | २.१९ | २.१२ | २.०६ | २.११ | १.७२ | १८.५७ |
| ४ | बाजारभोगाव | १.८३ | १.८४ | १.९३ | ०.३८ | १.८५ | १.७६ | १.८९ | १.७७ | १.८८ | १५.१३ |
| ५ | कळे | २.०४ | १.७९ | १.९३ | १.२८ | १.९३ | २.०८ | १.९८ | १.८४ | २.३५ | १७.२२ |

**माहितीचा स्त्रोत: संशोधकाने केलेली सांख्यिकी आकडेमोड.**

तक्ता क्र. १.३ मध्ये शैक्षणिक सुविधा, वैद्यकीय सुविधा, स्वच्छता विषयक सुविधा, मार्केट सुविधा, बँक सुविधा, वाहतुकीच्या सोई, संदेशवहन सुविधा, दै.वृत्तपत्र सुविधा व नळ पाणीपुरवठा सुविधा या निर्देशाकांची बेरीज करून संयुक्त विकास निर्देशांक काढला आहे. पन्हाळा तालुक्यातील सर्वाधिक संयुक्त विकास निर्देशांक हा कोडोली (२२.६९) मंडल विभागाचा असून त्याखालोखाल कोतोली (१८.५७) व कळे (१७.२२) या मंडल विभागांचा क्रमांक लागतो. तालुक्यातील सर्वात कमी संयुक्त विकास निर्देशांकाची नोंद बाजारभोगव (१५.१३) या मंडल विभागात झाली आहे. पन्हाळा हे ऐतिहासिक पर्यटन स्थळ तसेच तालुक्याचे ठिकाण असून या मंडल विभागाचा संयुक्त विकास निर्देशांक (१६.४०) इतका आहे.

**तक्ता क्र. १.४**

**मेट्रिक्स संहसंबंध (कोरिलेशन): संयुक्त विकास निर्देशांक व स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर**

| | Y1 | Y2 | X1 | X2 | X3 | X4 | X5 | X6 | X7 | X8 | X9 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Y1 | १.०० | ०.७५ | ०.४९ | ०.२१ | ०.२५ | ०.११ | ०.४७ | -०.२९ | -०.१४ | ०.१५ | -०.४३ |
| Y2 | | १.०० | -०.१६ | -०.१९ | -.०२१ | -०.३७ | -०.०८ | -०.६२ | -०.६२ | -०.३२ | -.०५६ |
| I | | | १.०० | ०.६५ | ०.७५ | ०.६१ | ०.९२ | ०.५० | ०.७४ | ०.७० | -०.१६ |
| II | | | | १.०० | ०.९९ | ०.९० | ०.८७ | ०.०५ | ०.७४ | ०.९८ | -०.४७ |
| III | | | | | १.०० | ०.८९ | ०.९२ | ०.१५ | ०.७९ | ०.९८ | -०.४३ |
| IV | | | | | | १.०० | ०.७२ | -०.०२ | ०.६४ | ०.९६ | -०.०७ |
| V | | | | | | | १.०० | ०.३३ | ०.७९ | ०.८६ | -०.४५ |
| VI | | | | | | | | १.०० | ०.७० | ०.११ | ०.२० |
| VII | | | | | | | | | १.०० | ०.७७ | -०.१६ |
| VIII | | | | | | | | | | १.०० | -०.०३ |
| IX | | | | | | | | | | | १.०० |

माहितीचा स्त्रोत: संशोधकाने केलेली सांख्यिकी आकडेमोड.

संयुक्त विकास निर्देशांका नुसार पन्हाळा तालुक्यातील **कोडोली** (२२.६९) विभाग हा इतर मंडल विभागांच्या तुलनेत जास्त विकसित आहे. कारण या मंडल विभागामध्ये वारणानगर तसेच कोडोली या ठिकाणी सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे यांच्या वारणा उद्योग समूहाच्या माध्यमातून औद्योगिक व शैक्षणिक प्रगती झाली आहे. तसेच प्राकृतिक भूरचनेच्या दृष्टीकोनातून वारणा नदीच्या खोऱ्यामध्ये कोडोली मंडल विभाग वसलेला असून त्यामुळे सुपीक मृदा व बारमाही जलसिंचन सुविधा मुळे या मंडल विभागाचा विकास घडून आला आहे. ग्रामीण वसाहतीच्या दृष्टीने कोडोली मंडल विभागामध्ये मोठी १५ गावे समाविष्ट असून पन्हाळा तालुक्याच्या २८.६५% इतकी सर्वाधिक लोकसंख्या या प्रदेशमध्ये स्थित आहे.

पन्हाळा तालुक्यातील सर्वात अल्प विकसित भाग म्हणून **बाजारभोगाव** या मंडल विभागाचा समावेश होतो. या मंडल विभागाचा संयुक्त विकास निर्देशांक १५.१३ इतका अत्यल्प आहे. बाजारभोगाव हे मंडल विभाग पन्हाळा तालुक्याच्या नैऋत्य दिशेला असून हा मंडल विभाग सह्याद्रीच्या सुमारे १००० मी उंचीच्या डोंगररांगांनी वेढला आहे. बाजारभोगाव या मंडळ विभागामध्ये तालुक्यातील १३१ पैकी सर्वाधिक ३१ गावे असून तालुक्याच्या केवळ १३.६८% इतकी लोकसंख्या या मंडल विभागामध्ये आहे. ग्रामीण वसाहतीच्या दृष्टीने लहान वसाहती या मंडल विभागाध्ये स्थित आहेत. जांभळी ही नदी या मंडल विभागाच्या मध्यातून वाहत असली तरी डोंगराळ जंगलव्याप्त भागामुळे इतर विभागांच्या तुलनेत या मंडल विभागाचा खूपच कमी विकास झाला आहे. **पन्हाळा** मंडल विभागाचा संयुक्त विकास निर्देशांक १६.४० इतका आहे. तालुक्यातील एकूण ५ मंडल विभागा पैकी या मंडल विभागाचा चौथा क्रमांक लागतो. पन्हाळा मंडल विभागाच्या मध्यातून मसाई पठाराचा विस्तृत प्रदेश पसरला आहे. तसेच या विभागातील २९ ग्रामीण वसाहती या पठाराच्या पायथ्याशी वसल्या आहेत. पन्हाळा हे ऐतिहासिक पर्यटन स्थळ तसेच तालुक्याचे ठिकाण असले तरी पठारी प्रदेशांमुळे या मंडळ विभागाच्या विकासावर मर्यादा आल्या आहेत.

कोतोली मंडल विभागाचा संयुक्त विकास निर्देशांक १८.५७ तर कळे मंडल विभागाचा १७.२२ इतका

आहे. कोतोली मंडल विभागातून कासारी तर कळे मंडल विभागातून धामणी व कुंभी नदी गेली आहे. कासारी, धामणी व कुंभी नदीच्या खोऱ्यामुळे या मंडळ विभागामध्ये जलसिंचनाच्या सोई उपलब्ध झाल्या आहेत तसेच कोतोली व कळे या मध्यवर्ती मार्केट सेंटर मुळे या मंडळ विभागातील गावांच्या विकासास चालना मिळाली आहे.

एकूण स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर (Y1) आणि बाल वयोगट लिंग गुणोत्तर (Y2) यांच्यामधील सहसंबंध हा उच्चस्तरीय (High) धनामक (०.७५) आहे, परंतु पूर्णस्तरीय (Perfect) धनात्मक नाही. कारण बालवयोगटातील स्त्री-पुरुष प्रमाण वाढले तर एकूण स्त्री-पुरुष प्रमाण वाढेलच असे नाही. कारण ० ते ६ वयोगटापुढील स्त्रियांच्या प्रमाणामध्ये अनेक कारणामुळे घट होते. यामध्ये प्रामुख्याने समाजामध्ये स्त्रीयांना दिली जाणारी दुय्यम वागणूक, लग्नानंतर स्त्रियांचे होणारे स्थलांतर, वैवाहिक जीवनामध्ये स्त्रीयांचा होणारा छळ यामुळे स्त्रीयांच्या मृत्यू प्रमाणामध्ये वाढ होऊन एकूण स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तरामध्ये घट होते. पन्हाळा तालुक्यातील एकूण लिंग गुणोत्तराशी X1 शैक्षणिक सुविधा (०.४९) व X5 बँक सुविधा (०.४७) या भौतिक सोई सुविधांचा मध्यमस्तरीय धनात्मक स्वरूपाचा आहे. म्हणजेच मंडल विभागातील वाढत्या शैक्षणिक सुविधा व बँक सुविधा मुळे एकूण स्त्री पुरुष लिंग गुणोत्तरावर परिणाम करणारा महत्वाचा घटक आहे. कारण शैक्षणिक सुविधामुळे साक्षरतेमध्ये वाढ होऊन वैचारिक प्रगती होते. तसेच स्त्रियांच्या शिक्षण, राजकारण व नोकरी या सर्वच क्षेत्रामध्ये वाढत्या प्रमाणामुळे "मुलगा म्हणजे उतार वयातील कुटुंबाचा आधार" यासारख्या जुन्या परंपरा मागे पडत चालल्या आहेत. बँक सुविधा असणे हे मंडल विभागाच्या आर्थिक प्रगतीचे लक्षण आहे. आर्थिक प्रगतीमुळे राहणीमान व जीवनमानामध्ये सुधारणा होऊन एकूण मृत्युदर कमी होऊन लिंग गुणोत्तर प्रमाण वाढण्यास मदत होते. पन्हाळा तालुक्यातील एकूण स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तरावर X2 वैद्यकीय सुविधा (०.२१), X3 स्वच्छता विषयक सुविधा (०.२५), X4 मार्केट सुविधा (०.११), X8 दै.वृत्तपत्र सुविधा (०.१५) या भौतिक सोई सुविधांचा निम्नस्तरीय सकारात्मक स्वरूपाचा परिणाम झाला आहे. केवळ X6 वाहतुकीच्या सोई (-०.२९), X7 संदेशवहन सुविधा (-०.१४) व X9 नळ पाणीपुरवठा सुविधा (-०.४३) यासारख्या सोई सुविधांचा स्त्री पुरुष लिंग गुणोत्तराच्या वाढीवर परिणाम झालेला नाही.

तक्ता क्र. १.४ वरून स्पष्ट होते की, बाल वयोगटातील (० ते ६) स्त्री पुरुष लिंग गुणोत्तरावर कोणत्याही घटकाचा सकारात्मक परिणाम झालेला नाही. कारण लहान मुला-मुलींच्या संगोपनावर भौतिक सोई सुविधांचा परिणाम घडून येतो परंतु अर्भक जन्म प्रमाण हे पूर्णःता जीवशास्त्रीय घटकावर अवलंबून असते. वरील बाल वयोगटातील लिंग गुणोत्तराच्या भौतिक सोई सुविधांचा नकारात्मक परिणामा झाल्याचे स्पष्ट होते. शिक्षणामुळे माणसाचे विचार समृद्ध झाले परंतु पहिला मुलगा झाल्यानंतर १ मुलावरच भविष्यातील खर्चाच्या ताळेबंध विचारात घेऊन लोक कुटुंब नियोजन करू लागले आहेत. परंतु त्याच ठिकाणी जर पहिली मुलगी झाली तर दुसरा मुलगा होण्यासाठी कुटुंबांकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. मोबाइल, इंटरनेट यासारख्या आधुनिक संदेशवहनाच्या साधनांनमुळे सोनोग्राफी रिपोर्ट वरील गर्भामधील प्लासेन्टा तसेच हृदयाचे ठोके यासारख्या गोष्टीवरून गर्भामध्ये मुलगा की मुलगी यासारख्या बाबी तपासल्या जातात. उदा "गर्भामध्ये मुलगा की मुलगी आहे कसे ओळखावे" यासारखा प्रश्न युटूब वर सर्च केला की लाखो व्हिडीओ तसेच त्या बाबतीत असंख्य माहिती उपलब्ध होते तसेच यासारखे व्हिडीओ लाखो लोकांनी पाहिलेले आहेत. व्हिडीओच्या खाली कमेंट बॉक्स मध्ये विशेषतः महिलांनी असंख्य प्रश्न मुलगा की मुलगी कसे ओळखावे याबाबत विचारले आहेत. यावरून शिक्षण, आर्थिक समृद्धता, आधुनिक संदेशवहन साधने, वैद्यकीय सुविधा यांच्या उपलब्धतेमुळे बाल वयोगटातील लिंग गुणोत्तरामध्ये वाढ झाली आहे की घट असा प्रश्न पडतो. तक्ता क्र. १.४ मधील सहसंबंधावरून स्पष्ट होते की बाल वयोगटातील लिंग गुणोत्तरावर भौतिक सोई सुविधांचा नकारात्मक

परिणाम झाला आहे.

**निष्कर्ष:**

देशातील आर्थिकदृष्ट्या विकसित मानल्या जाणाऱ्या पंजाब, हरियाणा, दिल्ली, गुजरात आणि महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये मुलींची संख्या झपाट्याने कमी होत आहे. त्यातही आर्थिक सुबत्ता असणाऱ्या शहरी भागांमधून मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर जास्तच विषम होत चालले आहे. पूर्वी गर्भजलपरीक्षा आणि आता अल्ट्रासाऊंड सोनोग्राफीच्या तंत्रज्ञानाचा गर्भाचे लिंग जाणून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात होणारा गैरवापर आणि त्यानंतर मुलीचा गर्भ असल्यास गर्भपात, तसेच एकूणच मुलगी म्हणून केले जाणारे दुर्लक्ष्य या सर्व कारणांमुळे मुलींची संख्या वेगाने कमी होत चालली आहे. महाराष्ट्रात विकसित समजल्या जाणाऱ्या जिल्ह्यामध्येच मुलींची संख्या कमी होत आहे. ज्या भागात आर्थिक विकास झाला, कारखानदारी आली आणि लोकांच्या हातात थोडा फार पैसा आला, तेथेच सोनोग्राफीचे तंत्रज्ञान घेऊन डॉक्टर पोहचले आणी परिणामी लिंगनिदान आणि मुलीचे गर्भपात मोठ्या प्रमाणात होत आहेत (महाराष्ट्र राज्य महिला आयोग). अभ्यास क्षेत्रामध्ये सुद्धा याच प्रकारची स्थिती प्रखरतेने दिसून येते. कालखंडाचा विचार केला असता बाल लिंग गुणोत्तरामध्ये दर १००० मुलांच्या मागे १९९१ (९३१) च्या तुलनेत २०११ मध्ये (८४३) ८८ मुली कमी झाल्या आहेत.

पन्हाळा तालुक्याचा प्रादेशिक विकास व एकूण तसेच बाल वयोगटातील लिंग गुणोत्तराचा अभ्यास केला असता असे  दिसून येते की ज्या भागात आर्थिक विकास झाला, कारखानदारी आली आणि लोकांच्या हातात थोडा फार पैसा आला, तेथेच लिंग गुणोत्तराचे प्रमाण कमी आहे. पन्हाळा तालुक्यातील सर्वाधिक प्रादेशिक संयुक्त विकास निर्देशांक हा कोडोली (२२.६९) मंडल विभागाचा असून त्याखालोखाल कोतोली (१८.५७) व कळे (१७.२२) या मंडल विभागांचा क्रमांक लागतो. तालुक्यातील सर्वात कमी संयुक्त विकास निर्देशांकाची नोंद बाजारभोगव (१५.१३) या मंडल विभागात झाली आहे. तसेच बाल वयोगटातील लिंग गुणोत्तराचा तुलनात्मक अभ्यास केला असता सर्वात कमी लिंग गुणोत्तर पन्हाळा (८१८) नागरी लोकसंख्या असलेल्या तर दुसरा क्रमांक कोडोली (८२३) मंडळ विभागाचा लागतो. कोडोली मंडल विभाग प्रादेशिक विकासाचा बाबतीत अग्रेसर आहे. बाजारभोगाव मंडल विभागाचा प्रादेशिक विकास सर्वात कमी असून बाल लिंग गुणोत्तर (९०२) व एकूण लिंग गुणोत्तर (९५१) इतर ४ मंडल विभागाच्या तुलनेत सर्वाधिक आहे.

**संदर्भ सूची:**


१. लक्ष्मीकांत देशमुख (२०१०): सेव्ह द बेबी गर्ल! सेव्ह द नेशन,  साप्ताहिक साधना

२. मोहन गुळवे व जोगेंद्र गायकवाड (२००५): लोकसंख्या भूगोल, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

३. वसुधा पुरोहित (२००५): विकास आणि पर्यावरणाचे अर्थशास्त्र, विद्या बुक पब्लिकेशन, औरंगाबाद

४. महाराष्ट्र राज्य महिला आयोग (२०१८): प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंधक कायदा, साहिल पब्लिकेशन, मुंबई

५. जोग. सु. रा (१९८०): सांख्यिकी भूगोल, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

६. एस.जी.भोसले (२०२०): सामाजिक भौतिक सुविधा आणि कोल्हापूर जिल्ह्याचा प्रादेशिक विकास, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड, अप्रकाशित पी.एच. डी शोध प्रबंध

७. कोल्हापूर जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन अहवाल २०१८.

८. कोल्हापूर जिल्हा जनगणना अहवाल १९९१, २००१ व २०११